सामना दि. 20/01/2023

# अर्चित चांडक यांनी केले पाच तासांत अंतर पूर्ण



बिलोली, दि.१९ (सा.वा.)- आशिया खंडातील सर्वांत मोठी मॅरेथॉन स्पर्धा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या टाटा मॅरेथॉन स्पर्धेत बिलोलीचे सहायक पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी पाच तासांत ४१.१९५ किमीचे अंतर धावून टाटा मॅरेथॉन स्पर्धेचे विजेते पदक मिळविले आहे. विशेष म्हणजे मॅरेथॉन स्पर्धा ही ७ तासांची असताना २ तास आधीच त्यांनी हे अंतर पार केले आहे.

मुंबई येथे १५ जानेवारी रोजी टाटा मॅरेथॉन स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत पोलीस दलातील अनेक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आपला सहभाग नोंदविला होता. बिलोलीचे सहायक पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनीही या स्पर्धेत भाग घेतला होता. त्यांनी पाच तासांत तब्बल ४१.१९५ किमीचे अंतर धावत विजेतेपद मिळविले आहे. टाटा मॅरेथॉन स्पर्धा ही सात तासांत ४२.१९५ किमी धावण्याची होती. पण आयपीएस अर्चित चांडक यांनी हे अंतर फक्त पाच तासांत पूर्ण करून विजेते ठरले आहेत.

**मुंबई मॅरेथॉन स्पर्धा**

अशा स्पर्धेसाठी सराव करण्याची खूपच गरज असते. सराव व प्रशिक्षण असेल तरच हे यश मिळविता येते, पण अर्चित चांडक यांनी हे न करताच स्पर्धेत यश मिळवून शरीरयष्टी उत्तम असल्यास अशक्य ते शक्य करून दाखवण्याचे सामर्थ्य माणसात असू शकते हे दाखवून दिले आहे. बहुतांश अधिकारी हे फिटनेसकडे लक्ष देत नसताना दिसून येतात. सर्व सुखसोयी असल्यामुळे त्यांचा आरामच आराम असतो, पण अर्चित चांडक हे आपल्या फिटनेसकडे अधिकच लक्ष देतात म्हणूनच हे यश त्यांना मिळाले असून, त्यांच्या यशाची गुरुकिल्ली ठरणाऱ्या त्यांच्या फिटनेसचे कौतुक होत आहे.